दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता



प्रतिनिधी नेमणे आहे


लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.



vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.१० सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 10 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 25 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# सी.पी.राधाकृष्णन भारताच्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत दणदणीत विजयी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–देशाच्या उपराष्ट्रपतीपदासाठी झालेल्या निवडणुकीत एनडीए आघाडीचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी बाजी मारली आहे. सी. पी. राधाकृष्णन यांची देशाचे पुढील उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली आहे. तर, इंडिया आघाडीच्या बी सुदर्शन रेड्डी यांचा पराभव झाला आहे. मंगळवारी (९ सप्टेंबर) झालेल्या उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत सी.पी. राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मतं पडली.'उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी एकूण ९८.०२ टक्के मतदान झाले. मतदान प्रक्रियेनंतर मतमोजणी संध्याकाळी ६ वाजता सुरु झाल्याचं' निवडणूक अधिकारी पीसी मोदी यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.निवडणूक अधिकारी पीसी मोदी यांनी सांगितलं की, उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी एकूण ७६७ खासदारांनी मतदान केले. त्यापैकी ७५२ वैध होते आणि उर्वरित १५ मतं अमान्य करण्यात आली.त्यांच्यासमोर विरोधी पक्षांचे संयुक्त उमेदवार म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी उभे होते.संख्याबळ एनडीएच्या बाजूने असल्याने, सीपी राधाकृष्णन यांचा विजय आधीच निश्चित मानला जात होता. परंतु क्रॉस व्होटिंग होऊ शकते अशी शंकाही व्यक्त केली जात होती.बी सुदर्शन रेड्डी यांना पहिल्या पसंतीची ३०० मते मिळाली आणि सी. पी. राधाकृष्णन यांना ४५२ मते मिळाली.उपराष्ट्रपती निवडणुकीच्या नियमांनुसार सीपी राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्याचं पी.सी. मोदी यांनी सांगितलं.**

सी पी राधाकृष्णन भाजपाचे माजी वरिष्ठ नेते आहेत. ते प्रदीर्घ काळापासून पक्ष संघटनेत सक्रिय आहेत. ते दोनवेळा लोकसभेचे खासदार म्हणून निवडून गेले आहेत. तसंच त्यांनी भाजपाच्या तामिळनाडूच्या प्रदेशाध्यक्षाची जबाबदारीदेखील सांभाळली आहे.सी पी राधाकृष्णन यांनी दक्षिण भारतात भाजपाचा विस्तार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तामिळनाडूच्या कोईंबतूर लोकसभा मतदारसंघातून ते दोन वेळा खासदार म्हणून निवडून गेले आहेत.१९९८ आणि १९९९ असे दोन वेळा ते निवडून गेले होते. मात्र त्यानंतर २००४, २०१४ आणि २०१९ मध्ये त्यांना लागोपाठ तीन वेळा कोईंबतूर मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागला होता.फेब्रुवारी २०२३ मध्ये त्यांची नियुक्ती झारखंडच्या राज्यपालपदी झाली होती. त्यानंतर जुलै २०२४ मध्ये ते महाराष्ट्राचे राज्यपाल झाले.सी पी राधाकृष्णन यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात विद्यार्थी चळवळीतून केली होती.२००७ मध्ये ते तामिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष होते. त्यावेळेस त्यांनी राज्यात ९३ दिवसांची १९,००० किलोमीटरची यात्रा केली होती. यात त्यांनी मुख्यत: नदी जोडो, दहशतवाद, समान नागरी कायदा, अस्पृश्यता आणि व्यसनाचे दुष्परिणाम यासारख्या मुद्द्यांवर लक्ष वेधलं होतं.यानंतर देखील त्यांनी धरणं आणि नद्यांच्या मुद्द्यांवर २८० किलोमीटर आणि २३० किलोमीटरच्या दोन यात्रा काढल्या होत्या.चंद्रपुरम पोनुसामी (सी पी) राधाकृष्णन यांचा जन्म २० ऑक्टोबर १९५७ ला तामिळनाडूतील तिरुप्पुरमध्ये झाला होता. त्यांनी बिझनेस डमिनिस्ट्रेशनची पदवी घेतली.त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) स्वयंसेवक म्हणून त्यांनी सुरुवात केली आणि १९७४ मध्ये ते भारतीय जनसंघाच्या राज्य कार्यकारिणी समितीचे सदस्य झाले.१९९६ मध्ये त्यांची नियुक्ती तामिळनाडूत भाजपाच्या सचिवपदी करण्यात आली. यानंतर ते कोईंबतूर लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले.खासदार असताना ते संसदीय स्थायी समितीचे (वस्त्रोद्योग मंत्रालय) अध्यक्ष होते. याशिवाय सी पी राधाकृष्णन, स्टॉक एक्सचेंज घोटाळ्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष संसदीय समितीचे सदस्य होते.२००४ मध्ये सी पी राधाकृष्णन यांनी संसदीय शिष्टमंडळाचा भाग म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत भाषण केलं. तैवानला जाणाऱ्या पहिल्या संसदीय शिष्टमंडळाचे ते सदस्यदेखील होते.२०१६ मध्ये ते कोचीस्थित कॉयर बोर्डाचं अध्यक्ष झाले. चार वर्षे त्यांनी या पदाची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतातून होणारी नारळाच्या शेंड्यांची (कॉयर) निर्यात २५३२ कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचली होती. २०२० ते २०२२ दरम्यान राधाकृष्णन भाजपाचे केरळमधील प्रभारी होते.

# हैद्राबाद गॅझेट रद्द करण्यात यावा ;बोगस कुणबी प्रमाणपत्र वाटप तात्काळ थांबवा

## सकल ओबीसी समाजाच्या केज तहसील कार्यालयावर मोर्चा

## तहसीलदार राकेश गिड्डे यांना दिले निवेदन


**केज । प्रतिनिधी**

सकल ओबीसी समाज केजच्या वतीने दि.९ सप्टेंबर २०२५ रोजी केज तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला यावेळी मोठ्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते.हैद्राबाद गॅजेट रद्द करा बोगस कुणबी प्रमाणपत्र वाटप तात्काळ थांबवा एक लाख रुपये देऊन प्रति कुणबी प्रमाणपत्र वाटप रेटने मोठ्या प्रमाणात बोगस कुणबी प्रमाण पत्र वाटपाचे काम आधी पासून सुरू आहे खोडाखोड करून कुणबी नोंदणी झालेली आहे.शासनाने तात्काळ कारवाई करावी व त्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी सरकारने सरसकट कुणबी प्रमाणपत्र वाटप



थांबवावे या जीआर विरोधात सकल ओबीसी समाज चांगलाच आक्रमक झाला मराठा समाज हा बहुसंख्येने महाराष्ट्रात एक नंबरचा समाज आहे व तो आर्थिक मागास नाही हैद्राबाद गॅजेट मध्ये मराठा व कुणबी ही वेगवेगळी जात आहे खरा कुणबी समाज आधीचओबीसी मध्ये आहे गोरगरीब ओबीसी समाजाचे शैक्षणिक,सामाजिक व राजकीय आरक्षण लुबाडायचा हा प्रयत्न काही राजकीय पक्ष व पुढारी करत असून आता ओबीसी समाज शांत बसणार नाही. जोपर्यंत जीआर रद्द होत नाही तोपर्यंत मोठ्या ताकदीने समाज रस्त्यावर उतरत आहे. दि.९ सप्टेंबर रोजी सकल ओबीसी समाजा च्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले व सरकार ने काढलेला जीआर तात्काळ रद्द करण्यात यावा यासाठी निवेदन देण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने ओबीसी समाजाचे बांधव उपस्थित होते यावेळी समता परिषदेचे सरचिटणीस अँड. सुभाष भाऊ राऊत यांच्यासह ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिबट्याने तीन शेळ्या आणि श्वानावर हल्ला करून केले ठार



**मोलगी । रवींद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील गंगापूर ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येणाऱ्या गुलाआंबा केलखाडी गावात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात तीन शेळ्या आणि एका पाळीव श्वानाचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी सकाळी साडेसहा ते सात वाजण्याच्या सुमारास घडली.

गुलाआंबा येथील रहिवासी इरमा धमण्या वसावे हे आपल्या शेळ्यांना नाल्याजवळ चारत असताना अचानक बिबट्या समोर आला. बिबट्याने शेळ्यांवर हल्ला चढवून एकापाठोपाठ एक अशा तीन शेळ्यांना ठार केले. यावेळी, नरपत मिर्या वसावे यांचा पाळीव श्वान शेळ्यांसोबत असल्याने त्याने भुंकून बिबट्याला पळवून लावण्याचा प्रयत्न केला. मात्र, बिबट्याने श्वानावर हल्ला करून त्याला घेऊन पळ काढला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


या घटनेनंतर इरमा धमण्या वसावे यांनी वनविभागाकडे बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी केली आहे. तसेच, मृत शेळ्यांचा पंचनामा करून तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

# नवापूर राष्ट्रीय महामार्गावर खड्ड्यांमुळे अपघात

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नवापूर राष्ट्रीय महामार्गावर दिनांक ७ सप्टेंबर रोजी सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास एका क्रेटा कारचा भीषण अपघात झाला. नेरकडून राजकोटच्या दिशेने जात असताना भींच रोडवर अचानक आलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. गाडी डिव्हाइडरला धडकून सर्व्हिस रोडवर पलटी झाली. सुदैवाने, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यामुळे महामार्गावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या अपघातामुळे, वाहनचालकांनी विशेषतः पावसाळ्यात सावधगिरी बाळगावी आणि



गाडी नियंत्रित वेगाने चालवावी, असे आवाहन करण्यात येत आहे. स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी ही खबरदारी घेणे आवश्यक आहे.

या घटनेमुळे, रस्त्यांची स्थिती सुधारण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रशासनाने योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे, हे पुन्हा एकदा समोर आले आहे.

# जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाचे यश रामेश्वरी बत्तीसे यांचा प्रेरणादायी प्रवास

**नंदुरबार । दिपक गोसावी**

कोणत्याही परिस्थितीत शिक्षणाची कास न सोडता, आलेल्या अडथळ्यांवर मात करत आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर रामेश्वरी गोपाळराव बत्तीसे (उर्फ रामेश्वरी योगेश मगरे) यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्य पात्रता (सेट) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या प्रवासाने अनेकांना प्रेरणा दिली आहे.रामेश्वरी यांना लहानपणापासूनच शिक्षणाची आवड होती. आईचे छत्र हरपले असतानाही, वडिलांनी नेहमी त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. याच प्रेरणेतून त्यांनी दहावी आणि बारावीमध्ये अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला. अत्यंत बिकट परिस्थितीत आणि बारावीनंतर लगेचच लग्न झाले असतानाही त्यांनी आपले शिक्षण थांबवले नाही. त्यांच्या पतीनेही त्यांना



शिक्षणासाठी नेहमी पाठिंबा दिला. हिंदी विषयाची आवड असल्याने त्यांनी याच विषयातून बीए आणि एमएची पदवी संपादन केली आणि त्यानंतर बीएड पूर्ण केले.

२०१७ मध्ये एका महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून रुजू झाल्यावर त्यांना वरिष्ठ महाविद्यालयातील नोकरीसाठी नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण होणे किती महत्त्वाचे आहे, हे समजले. सुरुवातीला या कठीण परीक्षेची त्यांना फारशी माहिती नव्हती. मात्र, 'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीप्रमाणे त्यांनी सातत्याने अभ्यास सुरू केला. दरम्यान, मुलांची जबाबदारी आल्यामुळे त्यांना काही काळ अभ्यास थांबवावा लागला. पण, नंतर नातलगांच्या प्रेरणेने त्यांनी पुन्हा अभ्यासाला सुरुवात केली.घराची संपूर्ण जबाबदारी सांभाळून त्यांनी जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर प्रामाणिकपणे अभ्यास केला. त्यांच्या या प्रवासात त्यांना त्यांच्या सासूबाईंनी खूप मोठी मदत केली. त्या मुलांची काळजी घेत असल्यामुळे रामेश्वरी यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळाला. याशिवाय पती, मुले, आई-वडील आणि भावानेही त्यांना नेहमीच पाठिंबा दिला.या यशाचे श्रेय त्यांनी आपल्या सासूबाईंना दिले आहे, ज्यांच्या पाठिंब्यामुळे त्या या शिखरावर पोहोचू शकल्या. तसेच, संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य, सहकारी प्राध्यापक आणि मित्र-मैत्रिणींच्या आशीर्वादाबद्दल त्यांनी आभार मानले आहेत.या यशानंतर रामेश्वरी बत्तीसे यांना पीएचडीसाठी पात्र ठरवले असून, प्राध्यापक डॉक्टर शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली त्या पुढील शिक्षण घेणार आहेत. रामेश्वरी यांचा हा प्रवास हे सिद्ध करतो की, योग्य नियोजन, कठोर परिश्रम आणि कुटुंबाच्या पाठिंब्याने कोणतीही गोष्ट अशक्य नाही.

संपादकीय

# अमेरिकन टेनिस ची नवी तारका

आर्यना सियारहिजेउना सबालेंका ही अमेरिकन ओपन टेनिसची यंदाची नवी तारका ठरली आहे. तिने नुकत्याच झालेल्या अंतिम सामन्यात अमांडा अनिसिमोव्हाला ६-३, ७-६ असा विजय मिळवला. आज सर्वात महान खेळाडू म्हणून ती ओळखली जाणार. सबालेंकाचे हे चौथे आणि या वर्षातील अखेरचे ग्रँडस्लॅम विजेतेपद होते. पण तिचा इथपर्यंतचा प्रवास निश्चितच वेदनादायक आणि खडतर होता. कारण अमेरिकन टेनिस ओपन विजेतेपद ही स्पर्धा हार्ड कोर्टवर खेळली जाते. त्यामुळे येथे प्रत्येक खेळाडूचा आणि त्याच्या शारीरिक क्षमतेचा कस लागतो. त्यातही ती महिला असेल तर जास्तच अवघड जाते. त्यामुळे अमेरिकन ओपन स्पर्धा जिंकणे ही तशीही आगळीवेगळी बाब आहे. ती यंदा आर्यनाने करून दाखवली आणि तिचे हे चौथे ग्रँडस्लॅम विजेतेपद आहे. आर्यना हिने आता किम क्लिस्टर्स, आरांता विकारिओ, नाओमी ओसाका आणि हाना मँडलिकोवा यांच्याशी बरोबरी साधली आहे. विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात पराभव पत्करल्यावर त्याच खेळाडूवर म्हणजे अनिसिमोव्हाबरोबर खेळण्यासाठी ती उतरेल असे कुणालाही वाटले नव्हते. पण आर्यनाने ही जिद्द दाखवली आणि तिने विजयही मिळवून दाखवला. खरे तर हा सामना गुंतागुंतीचा होता. पण जेतेपद कायम राखण्याच्या इराद्याने मैदानात उतरलेल्याा आर्यना सबालेंका हिने पहिल्यापासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवलं. पहिला सेट ६-३ असा एकतर्फी आपल्या नावे केला. दुसऱ्या सेटमध्येही प्रतिस्पर्धी आणि पहिल्या ग्रँडस्लॅमसाठी खेळणाऱ्या अमांडा अनिसिमोव्हा हिने तिला टक्कर देण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी ती फिकी ठरली. हा सेट ७-६(३) असा जिंकत सबालेंकानं या स्पर्धेतील विजयी सिलसिला कायम ठेवत विजेतेपदावर आपले नाव कोरले.आर्यनाने अंतिम सामन्यात ज्या पद्धतीने लढा दिला आणि तिच्या भावनांना हाताळण्यास ती सक्षम ठरली ती खरोखरच प्रशंसेस पात्र आहे. आर्यना ही जास्त निडर आणि स्पष्ट विचारांची आहे. आर्यना सबालेंकाने विम्बल्डनच्या पराभवाचा बदला घेतला आहे, असे आता टेनिस जगतात बोलले जाऊ लागले आहे. त्याबरोबरच बेलारूसच्या या सुंदरीच्या विजेतेपदाचे अनिसिमोव्हाचे विजेतेपदाचे स्वप्न धुळीस मिळवले. अनिसिमोव्हाला प्रेक्षकांचा प्रचंड पाठिंबा असतानाही त्याने विचलित न होता सबालेंका शांत आणि थंड डोक्याने खेळली. आपल्या घरच्या मैदानावर अनिसिमोव्हाला प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत होता. पण सबालेंका शांत राहिली आणि थंड डोक्याने तिने आपले जोरदार फटके खेळले. विजेतेपद असेच घडत असतात. अगेन्स्ट ऑल ऑड्स जो विजय मिळवतो तोच खरा विजेता असतो. हे सबालेंकाने दाखवून दिले. यूएस ओपन टेनिस हे हार्ड कोर्टवर खेळले जाते आणि त्यात मोठ्या सर्विस करणाऱ्यांना तितकेसे अनुकूल वातावरण नसते. याअर्थाने हार्ड कोर्ट हे विविध शैली असलेल्या आणि खेळण्याच्या वेगवेगळ्या स्टाईल्स असलेल्या खेळाडूंना उपयुक्त असते. या खेळातील सर्व्हिसचा वेग, चेंडूचा वेग आणि अनिश्चितता यावर मात करत सबालेंकाने विजय मिळवला हेच तिच्या विजयाचे वैशिष्ट्य. हार्ड कोर्ट हे टेनिसमधील सर्वात जलद सर्व्हिसचे माहेरघर मानले जाते. पण हार्ड कोर्टवर खेळताना खेळाडूंसाठी एक अत्यावश्यक बाब म्हणजे त्याचे शारीरिक चापल्य आणि मानसिक संतुलन. या दोन्ही बाबतीत आर्यनाने अप्रतिम कौशल्य दाखवले आणि विजय मिळवला. १८ वेळा ग्रँडस्लॅम विजेती राहिलेली मार्टिना नवरातिलोव्हा हिच्या मते सबालेंका हिने दाखवलेला संयम आणि तिची शक्ती हीच तिच्या विजयाची गुरूकिल्ली होती. अत्यंत दबाव असतानाही आर्यनाने ती टेनिसची चॅम्पियन आहे हे दाखवून दिले.अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धा ही हार्ड कोर्टवरील सर्वात अवघड स्पर्धा समजली जाते पण तिच्या आव्हानांतच तिची ताकद समाविष्ट आहे. टेनिसमध्ये आज क्रिकेटइतकाच किंबहुना त्यापेक्षाही जास्त पैसा आहे, कारण टेनिस हा खेळ आता प्रगत देशात खेळतात आणि भारतही त्यात मागे नाही. भारताचे विजय अमृतराज आणि लिअँडर पेस आणि महेश भूपथी यांनी देखील भारताचे नाव राखले. पण भारताच्या महिलांनी तशी शानदार कामगिरी केली नाही. पण त्यांना उत्तर अमेरिकन टेनिस खेळाडूंचे आहे. या खेळाडूंना पुरुषांइतकेच चापल्य आणि तंदुरुस्ती दाखवावी लागते. तेव्हा कुठे त्या यशस्वी होतात. ते या सर्व खेळाडूंनी केले आहे. आर्यना सबालेंका हिने अत्यंत गंभीर आव्हानांवर मात करत अमेरिकन ओपन टेनिसचे विजेतेपद जिंकले आहे. त्यात प्रथम होती खांद्याला झालेली दुखापत आणि त्यातून तिच्या सर्व्हिसवर परिणाम करणारे आरोग्याचे प्रश्न आणि त्याबरोबरच मानसिक आरोग्य सांभाळण्याची कसरतही करावी लागते. कारण क्रिकेटप्रमाणेच टेनिस हाही खेळ शारीरिक कमी आणि मानसिकरीत्या जास्त ताकदीचा आहे आणि जो मानसिकदृष्ट्या प्रबळ असतो तोच विजेता होतो. या सर्वांवर मात करून आर्यना सबालेंकाने विजेतेपद मिळवले आणि तिच्या प्रतिस्पर्ध्यावर मात केली. अजून सबालेंकाला बरीच मजल मारायची आहे. सबालेंकाने नुकतेच आपले वडील गमावले. त्या काळात ती मानसिकरीत्या पूर्णपणे ढासळली होती. त्यावर तिला मात करायची होती. त्यामुळे तिने सर्व संकटांवर मात करून अमेरिकन ओपनचे विजेतेपद मिळवले हे निश्चितच तिच्या प्रखर निर्धाराचे आणि विजेतेपदासाठी काहीही करण्याची तयारी दाखवून देते. कधीकधी आर्यना आपला संयम हरवते आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यावर संतापते. असे या वरच्या दर्जाच्या खेळाला चालत नाही. हा धडा ती शिकली आहे आणि काल ती ज्या संयमाने आपली टेनिसची रॅकेट फिरवत होती त्यावरून तिने या उणीवेवर मात केली आहे असे दिसते. या नव्या अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या तारकेला सलाम.


# 'घराकडे लवकर येवा रे'



कोकणातील माणसे सुंदर कोकण सोडून शहरात आली ती नोकरीसाठी. मुलांना खाऊ घालण्यासाठी त्यांच्या शिक्षणासाठी. मुंबईतल्या सिमेंटच्या जंगलात ही माणसे मोठी झाली. आईचं प्रेम आणि वडिलांची सावली सोडून गेल्यावर जशी अवस्था लेकराची होते तशीच काहीशी अवस्था कोकणातील माणसाची होत असेल हे नक्की. मुंबईत त्याचा जीव नेहमीच त्याच्या गावात गुंतलेला असतो. कोकणातील अनेक चाकरमान्यांनी आता परदेशही गाठलय. पण आजही गावची ओढ त्यांच्या हृदयात आहे. दरवर्षी गणपतीला चाकरमानी आणि कोकणातली लाल माती हे एकमेकांना जोडले गेले आहे. हेच नातं त्यांना वर्षातून एकदा तरी जवळ आणतं. आपल्या घरापासून लांब राहिलेल्या लेकराला तेवढ्याच आपुलकीनं कोकण आजही आपलस करतं. गावातून सुट्टी संपवून परतीचा प्रवास करताना 'घराकडे लवकर येवा रे' म्हणत 'पोहोचल्यावर पत्र पाठव, सांभाळून प्रवास कर, जीवाला जप बाळा' हे मायेचे बोल विसरता येत नाही.

महाराष्ट्र राज्यामध्ये प्रत्येक विभागामध्ये सण, उत्सव त्यांच्या-त्यांच्या रितीरिवाजाप्रमाणे सर्वच सण, उत्सव साजरे केले जातात. कोकण हा नेहमीच सण, उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करणारा प्रांत आहे. कोकणात ग्रामदेवतेची यात्रा, मंदिरांचे जिर्णोद्धार, दिवाळी, दसरा, शिमगोत्सव त्यातही कोकणवासीय गणेशोत्सव मात्र वेगळ्या उत्साहाने साजरा करतात. गणेशोत्सवात कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर या सर्व जिल्ह्यांमध्ये गणेशोत्सव साजरा होतो. या गणेशोत्सवात कोकणात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आदी शहरांमध्ये येणारा नोकरी-व्यवसाय या निमित्ताने गावाबाहेर असणारा कोकणवासीय मात्र न चुकता गावात परततात. मुंबई ते कोकणचा त्यांचा प्रवास कितीही खडतर असला तरीही कोकणवासीय मात्र गावाकडे येतोच. पाच, सात आणि शक्य असेल, तर अकरा दिवस गावाकडील घरात गणेशमूर्ती आणून उत्सव साजरा करतो. मुंबईतून येणाऱ्या नोकरी करणाऱ्या अनेक कुटुंबातील मुंबईकरांना फार ओढाताण करून गावाकडे यावे लागते; परंतु कितीही अडचणी आल्या तरीही त्यावर मात करत मुंबईकर या गणपती उत्सवासाठी गावात येतोच.पूर्वीच्या पिढीतील अनेकांनी अतिशय कठीण काळातही गणपती उत्सवाला यायच कधी टाळले नाही. मात्र, कोकणात राहून कुटुंबाचा उदरनिर्वाह करता येणार नाही. केवळ यामुळेच गावो-गावच्या अनेक कुटुंबातील गाववाले शहर गाठतात. आज अनेकांना शहरात रहाण नकोय; परंतु शेवटी कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा आहे या एकाच कारणाने अनेकजण फार कष्टाचे, त्रासाचे जीवन असतानाही गाव सोडून शहरात काम करत असतात. दरवर्षी गावच्या घरात गणपती आणायचा आहे. त्यांच्या-त्यांच्या आर्थिक कुवतीनुसार गणेशोत्सव साजरा करीत असतात. गणेशोत्सव झाला, गणपती विसर्जनानंतर कोकणाबाहेर नोकरीनिमित्ताने राहिलेल्या कोकणवासीय गावातून पुन्हा शहरांकडे जातो. अनेकांची घर बंद असतात. वर्षभरात जेव्हा कधी कोकणवासीय पुन्हा गावाकडे येतील तेव्हा गावातील घरं उघडत असत. इतरवेळी कोकणातील अनेक घर कुलूपबंद असतात. गावातील काही घरातून सुरकूतलेल्या चेहऱ्याचे वृद्ध गावात दिसतात. अनेक घरातून एखादी वृद्ध महिला किंवा वृद्ध दांपत्य गावातील घरात असतात. घरातील मुलगा, सून, नातवंड शहराकडे जायला निघाली की गणेशोत्सवाच्या आदल्यादिवशी मुलं घरी येणार म्हणून ज्या अमाप उत्साहाने मुलांच्या, नातवंडाच्या स्वागताला घरात असतात; परंतु पाच दिवसांनी, सात दिवसानंतर किंवा अकरा दिवसांनी गणपती विसर्जन झाल्यावर जेव्हा एखाद्या कुटुंबातील मुंबईकर नोकरी, व्यवसायावर हजर होण्यासाठी घराबाहेर पडतो तेव्हा घरातील वृद्धा ज्या आशेवर पुढच्यावर्षी लवकर ये गणपतीला सांगते अगदी त्याच भावनेतून आपल्या शहरात जाणाऱ्या मुलांना, नातवंडांना डोळयात आलेलं पाणी लपवत पदर तोंडाला लावत 'घराकडे लवकर येवा रे' म्हणून जेव्हा आई- मुलाला सांगते तेव्हा कोकणातून नोकरी व्यवसायासाठी घर सोडणारा मुलगाही आतून गलबलतो. पण त्याचा नाईलाज असतो. आईला चेहरा न दाखवता भावनिकतेने तो घर सोडतो.शहरांच्या रोजच्या धबडक्यात तो इतका हैराण होतो. त्याला इच्छा असूनही वारंवार गावात येता येत नाही. मग गावातल्या घरांमध्ये वयोवृद्ध असतात. शेजारच्या घरातही जाण्या-येण्या एवढ्या स्थितीतही ते नसतात. मग फक्त जो कोणी गावात भेटेल त्याच्याशी भरभरून बोलणारी वृद्ध माणसं गावो-गावी फिरताना भेटतील बंद घर आणि वयोवृद्ध माणसं ही प्रत्येक गावातील वाड्या-वस्त्यांमध्ये दिसणारे दृश्य आहे. दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस, अकरा दिवसांनी गणपतीचे विसर्जन करण्यात येते. गणपतीच्या मूर्ती विसर्जनानंतर प्रत्येक घर सुनं-सुनं वाटत. गणपती घरामध्ये असताना घरातल वातावरण भारलेल असत. गणपती विसर्जनानंतर घर सुनंसुनं वाटत तसच घरातील कोकणवासीय मुंबई, पुणे शहराला निघाले की तसच वाटत असत. पंचवीस वर्षांपूर्वी गावातील एखाद्या वाडीतील कोणी मुंबईकर मुंबईला जायला निघाला की त्याला परतीच्या प्रवासाचा निरोप देण्यासाठी वाडीतील दहा-वीस जण तरी सोडायला जायचे. तस म्हटलं तर फार मोठी अपेक्षा काहीच नव्हती. कोणी काही देऊही शकत नव्हता. याच कारण शहरांमध्ये नोकरी करणारा कोकणवासीयाची आर्थिक परिस्थितीही जेमतेमच होती.रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात तर गावो-गावी हेच चित्र असायचे. रायगडमध्ये काही कारखानदारी आली. काही मोठे उद्योग आल्याने काही प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध झाल्या. परंतु त्यात स्थानिक किती हा परत प्रश्न आहेच; परंतु तरीही काहींनी गावात रोजगार उपलब्ध झाला असला तरीही रायगड जिल्ह्यातील ही ग्रामीण भागातील अनेक कुटुंबातील तरुण रोजगाराच्या शोधात शहरांमध्येच गेलेला दिसून येईल. अर्थात आजची विविध क्षेत्रात इंजिनीअर झालेले तरुण केवळ आपल्या कोकणात इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतलेल्यांसाठी इथे उद्योग नाही. त्यामुळे ते शहरांकडे जात आहेत. त्यातल्या अनेकांना कोकणात राहूनच करिअर करण्याची इच्छा आहे. पण संधीच नाही. यामुळे केवळ नाईलाजाने गाव, घर सोडावे लागते. घरातील सुरकूतलेल्या आजी-आजोबांचा चेहरा त्या गावच्या तरुणालाही अस्वस्थ करतो. पण शेवटी नोकरी त्याला खुणावते आणि तो गाव सोडतो. प्रत्येक गावातून अनेक घर बंद आहेत. कोकणातील हे बंद घरांच्या दरवाजा आडून येणारे हुंदके अस्वस्थ करणारे आहेत. कोकणातील हे सारे चित्र लवकर बदलावे हिच कोकणवासीयांची अपेक्षा आहे. मंगलमुर्तीच्या उत्सवातले हे मंतरलेले, मंत्रमुग्ध करणाऱ्या दिवसाची शिदोरी घेऊन वर्षभराची ऊर्जा घेऊन कामाच्या गावी परतणाऱ्या परिवाराला खेड्याकडे चला असे सांगण्यासाठी तसे वातावरण तयार करायला हवे...

# कोकणातील घरफोड्या थांबणार कधी ?



सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मागील दहा ते पंधरा वर्षांपासून विविध ठिकाणी घरफोड्या होत आहेत. त्या अजूनही थांबलेल्या नाहीत. जिल्ह्यात होणाऱ्या घरफोड्या थांबणे गरजेचे आहे. ज्या तालुक्यात किंवा गावात चोरी झाली असेल त्या ठिकाणच्या नागरिकांना विश्वासात घेऊन खाकीवर्दीला मदत करण्याचे आवाहन करणे. ज्याठिकाणी पोलीस बळ कमी पडत असेल त्याठिकाणी स्थानिक नागरिकांमधून मानधनावर स्वयंसेवक नेमणे म्हणजे चोरट्यांना पकडणे अधिक सुलभ होईल. मात्र तो आपल्याला दिलेल्या पदाचा गैरवापर करणार नाही याची खात्री करावी लागेल. केवळ जिल्ह्यात नव्हे तर इतर ठिकाणी होणाऱ्या घरफोड्या थांबण्यास मदत होईल.महाराष्ट्र राज्यातील कोकण विभागामधील जिल्ह्यांचा विचार करता सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मागील दहा ते पंधरा वर्षांपासून विविध ठिकाणी घरफोड्या होत आहेत. त्या अजूनही थांबलेल्या नाहीत. तसे इतर जिल्ह्यांमध्ये सुद्धा घरफोड्या झाल्याचे वर्तमानपत्रांत वाचायला मिळतात. मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस घरफोड्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. हे थांबणे गरजेचे आहे. मात्र तसे होताना दिसत नाही. काही वेळा संशयित म्हणून पकडले गेले, त्याचप्रमाणे इतर राज्यांमधून सुद्धा पकडून आणण्यात आले असे स्थानिक वर्तमानपत्रांमधून वाचायला मिळते. मात्र त्याचे पुढे काय झाले? याचे उत्तर मात्र गुलदस्त्यात राहिले आहे. दिवसेंदिवस होणारी घरफोडी ही पर्यटन जिल्ह्याच्या दृष्टीने योग्य नाही. तेव्हा जिल्ह्यातील घरफोड्या थांबणे गरजेचे आहे. आतापर्यंत काही उपाययोजना करण्यात जरी आल्या असल्या तरी जिल्ह्यातील घरफोड्या थांबविता आलेल्या नाहीत. घरफोडी झाल्यावर चोरटे सराईत गुन्हेगार असल्याची मात्र जोरदारपणे चर्चा होत असते. तेव्हा आरोपींना अटक करण्यात आले तरी त्यांच्यावर योग्य ती कायदेशीरपणे कारवाई होणे आवश्यक आहे. म्हणजे कोणी बंद घरफोडण्याच्या नादाला लागणार नाही. काही वेळा एका रात्रीत आठ बंद घरे फोडण्यात आलेली होती. त्यामुळे आता खाकी वर्दीला एकप्रकारे आवाहन दिल्यासारखेच आहे. अशावेळी स्थानिक रहिवाशांनी सुद्धा जागृत राहिले पाहिजे. आपल्या गावात किंवा वाडीमध्ये अनोळखी व्यक्तींचा वावर आहे का? त्याचप्रमाणे गावच्या पोलीस पाटलांनी करडी नजर ठेवली पाहिजे. कारण पोलीस पाटील हे स्थानिक रहिवासी असून त्यांना गावची पूर्ण माहिती असते.खरे म्हणजे, चोरट्यांचे लक्ष बंद घरे फोडण्याकडे असते. तसेच ते येणा-जाणाऱ्या नागरिकांवर पाळत ठेवतात. त्यामुळे त्यांना गुपचूप घर फोडणे शक्य होते. त्यातील सोने-चांदी अशा मौल्यवान वस्तूंची चोरी करणे. त्यात रोकड पैशांवर डल्ला मारणे. देवळातील घंटा लंपास करणे आणि काहीच मिळाले नाही तर कोंबड्या सुद्धा पळविणे हे चोरांसाठी सर्रास झाले आहे. इतकेच नव्हे तर गाव कुसाबाहेर असलेल्या शाळेत सुद्धा सुट्टीच्या दिवसांत दरवाजाचे टाळे फोडून शाळेतील वस्तू पळवून नेलेल्या आहेत. अलीकडे तर सीसीटीव्ही कॅमेरे फिरवून गजबजलेल्या वस्तीमधील सोन्या-चांदीचे ज्वलर्स सुद्धा लुटू लागले आहेत. म्हणजे अट्टल गुन्हेगार आहेत. त्यामुळे आता केवळ खाकी वर्दी नव्हे तर नागरिकांनी सुद्धा सतर्क राहणे गरजेचे आहे.आता आपण जिल्ह्यात घरफोड्या ज्या होत आहेत त्या का होत आहेत याची कारणे शोधणे आवश्यक आहे. तरच त्यावर योग्य उपाययोजना करता येतील. जिल्ह्यातील बेकारांचा जरी विचार केला तरी जे संशयित चोर म्हणून पकडण्यात आलेले आहेत, त्या चोरांची नावे व त्यांच्या पत्त्यांचा विचार करता हे चोर जिल्ह्याच्या बाहेरचे आहेत. त्यामुळे हातांना काम नसल्यामुळे असे बेकार लोक चोरीचा मार्ग स्वीकारतात. याचे प्रमुख कारण म्हणजे गरिबी होय. आपण जर बारकाईने निरीक्षण केले तर लोकांना आपला उदरनिर्वाह करण्यासाठी रोजगार मिळत नाही. मिळाला तरी हंगामी, तो सुद्धा अपुरा. आपल्या कुटुंबाचा खर्च चालविणे त्यांना शक्य नसते त्यामुळे त्यांच्याजवळ काहीच पर्याय शिल्लक नसतो. शेवटचा पर्याय म्हणून दुसऱ्या जिल्ह्यात किंवा राज्यात जाऊन लोक चोरी करताना आढळून येत आहेत. यात कामधंदा नसल्यामुळे अनेक लोक व्यसनाधीन झालेले दिसून येत आहेत.लोकवस्ती विखुरलेली आणि पोलीस बळ कमी असल्यामुळे बंदोबस्तासाठी पोलीस यंत्रणा कमी पडते. याचा परिणाम काही ठिकाणी घर फोडणे सोपे जाते. तसेच आजूबाजूला जंगल व पायवाट असल्याने दडून बसने किंवा पळून जाणे चोरट्यांना सहज सोपे होते. त्यासाठी चोरटे टेहळणी करतात असा स्थानिक लोकांचा संशय आहे. तेव्हा पोलिसांनी सुद्धा स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन आपला बंदोबस्त चोख ठेवावा. त्याचप्रमाणे ठिकठिकाणी नाकेबंदी करावी. गावातील खबऱ्यांकडून माहिती घ्यावी. तसेच संशयित ठिकाणी गस्त वाढवावी. आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. तसेच ते सुरू असल्याची खात्री करावी. महत्त्वाची बाब म्हणजे, ज्या तालुक्यात किंवा गावात चोरी झाली असेल त्या ठिकाणच्या नागरिकांना विश्वासात घेऊन खाकीवर्दीला मदत करण्याचे आवाहन करणे.ज्याठिकाणी पोलीस बळ कमी पडत असेल त्याठिकाणी स्थानिक नागरिकांमधून मानधनावर स्वयंसेवक नेमणे म्हणजे चोरट्यांना पकडणे अधिक सुलभ होईल. मात्र तो आपल्याला दिलेल्या पदाचा गैरवापर करणार नाही याची खात्री करावी लागेल. केवळ जिल्ह्यात नव्हे तर इतर ठिकाणी होणाऱ्या घरफोड्या थांबण्यास मदत होईल. केवळ घरफोड्या झाल्या म्हणजे सोने, चांदी व रोकड रक्कम गेली इतकेच नुकसान झाले असे म्हणता येणार नाही. चोरी झाल्यास ज्या वर्षी सोने किंवा चांदी खरेदी केलेले असेल त्यावेळच्या दराने पोलीस स्टेशनला नोंद केली जाते. नंतर चौकशी सुरू होते. तो भाग वेगळा मात्र त्यामुळे घर मालकाला मानसिक धक्का सहन करावा लागतो. चोरी जरी झाली तरी घराचा दरवाजा फोडला जातो. घरातील फर्निचर व कपाट फोडले जाते. मात्र त्याची नोंद पोलीस स्टेशनला केली जात नाही.थोडक्यात असे म्हणता येईल की, घरफोड्या जिल्ह्यातील किंवा परजिल्ह्यातील असोत त्यांच्या रिकाम्या हातांना काम दिले गेले पाहिजे. म्हणजे नागरिक घरफोड्या करण्याचा विचार करणार नाहीत. हा प्रभावी उपाय जिल्ह्यातील घरफोड्या थांबविण्यासाठी महाराष्ट्र सरकारला करावा लागेल. तसेच योग्य ती कायदेशीर शिक्षा घरफोड्यांना करावी लागेल तरच कोकणातील घरफोड्या थांबतील. त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची खरी गरज आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान जिल्ह्यातील प्रत्येक गावात यशस्वीपणे राबवा-सभापती प्रा.शिंदे







**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

गाव समृद्ध झाले तरच राज्याचा सर्वांगीण विकास साधता येणार आहे. यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान जिल्ह्यातील प्रत्येक गावात यशस्वीरित्या राबवून जिल्हा राज्यात अभियानात अग्रेसर राहील, यादृष्टीने प्रयत्न करण्याचे आवाहन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा आज सुखकर्ता लॉन्स येथे उत्साहात पार पडली. यावेळी सभापती प्रा. शिंदे बोलत होते. याप्रसंगी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार विठ्ठलराव लंघे, पद्मश्री पोपट पवार, यशदाचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राहुल शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, प्रत्येक गावाला वीज, पाणी, शिक्षण, रस्ते यासह पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम पंचायतराज व्यवस्थेमार्फत केले जाते. विविध अभियान व योजनांच्या माध्यमातून गावच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून गावाच्या विकासाची मोठी संधी मिळाली आहे. या संधीचं सोने करत आपले गाव समृद्ध करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने या अभियानात हिरिरीने सहभाग नोंदवावा. अभियानात तालुकास्तरावर प्रथम येणाऱ्या पंचायत समितीस १५ लाख रुपये, जिल्हास्तरावर ५० लाख रुपये, विभाग स्तरावर १ कोटी रुपये तर राज्यस्तरावर प्रथम येणाऱ्या पंचायत समितीस ५ कोटी रुपयांचे बक्षिस देऊन गौरविण्यात येणार आहे, असेही श्री.शिंदे यांनी सांगितले.

सक्षम ग्रामपंचायतींवरच महाराष्ट्राचा विकास अवलंबून -पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, गाव पातळीवर पाणी, रस्ते, वीज, आरोग्य व शिक्षणाचा दर्जा उंचावणे हेच या अभियानाचे उद्दिष्ट आहे. ग्रामपंचायती लोकशाहीची पहिली पायरी असून त्या सक्षम झाल्या तरच खऱ्या अर्थाने समृद्ध महाराष्ट्र घडेल. प्रत्येक गावाने आपला विकास आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी.राज्य शासनामार्फत अनेकविध विकासाच्या योजना राबवल्या जातात. या योजनांची माहिती घेऊन त्यांची आपल्या गावात अंमलबजावणी करण्याची गरज आहे. शासकीय योजनांची माहिती होण्यासाठी तालुकास्तरावर कार्यशाळांचे आयोजन करावे. गावातील जनजीवनात आमूलाग्र बदल घडविण्यासाठी हे अभियान राबविण्यात यावे. प्रत्येक गावाने स्वच्छतेला अधिक महत्त्व देऊन वैयक्तिक शौचालयांची अधिकाधिक उभारणी करून हागणदारीमुक्त होणे आवश्यक आहे, असेही श्री. विखे पाटील यांनी सांगितले.आमदार श्री.पाचपुते म्हणाले, गाव हा विकासाचा केंद्रबिंदू असून वेळेप्रमाणे बदल घडवत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याची गरज आहे. ग्रामपंचायतींनी स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. बांबू शेती ही शाश्वत उत्पन्न देणारी असून यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. प्रत्येकाने संधीचं सोनं करून गावाच्या विकासाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.आमदार श्री. दाते म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विविध योजनांद्वारे गावे सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातात. हिवरेबाजार व राळेगणसिद्धी या ग्रामपंचायतींचा आदर्श घेत योजना ठराविक कालावधीसाठी न राबवता त्या सातत्याने व सेवाभावाने राबवाव्यात. गाव समृद्ध करणारे हे अभियान प्रत्येक गावात राबवून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवण्याचे आवाहनही त्यांनी केले.आमदार श्री.लंघे म्हणाले, त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेतून गावाच्या विकासाला प्राधान्य दिले जाते. ग्रामपंचायतीनी कर वसुलीला प्राधान्य द्यावे. स्पर्धेच्या युगात ग्रामपंचायती सक्षम करण्याची आवश्यकता आहे. वृक्षारोपणालाही प्राधान्य दिले जावे, असे ते म्हणाले.पद्मश्री पवार म्हणाले, विविध अभियानांच्या माध्यमातून गावाच्या विकासासाठी प्रयत्न होत आहेत. संधी म्हणून या अभियानाकडे पाहून प्रत्येकाने उत्साहाने सहभाग नोंदवावा. पंचायतराज व्यवस्था ही गावाच्या विकासाची खरी नांदी असल्याचेही ते म्हणाले.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.भंडारी प्रास्ताविकात म्हणाले, राज्याला अभियानाची मोठी परंपरा आहे. अभियानाच्या माध्यमातून अनेक ग्रामपंचायती आदर्श ठरल्या आहेत. गावाच्या विकासासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीची करवसुली ९० टक्क्यांपर्यंत व्हावी. जिल्ह्यात २८ हजार महिला बचत गटांतून ३ लाख महिला कार्यरत असून त्यांना सहभागी करून ग्रामसभा बळकट करावी. कचरा व सांडपाणी व्यवस्थापनावर भर देऊन या कामाला प्राधान्य द्यावे. पर्यावरण लक्षात घेऊन वृक्षारोपणाला प्राधान्य द्यावे. उपजीविकेच्या बाबतीत ग्रामपंचायतीने काम करून प्रत्येकाला रोजगार उपलब्ध करून द्यावा. सौरऊर्जा, ऑनलाईन सेवा व पारदर्शक कारभारासह गावाच्या विकासासाठी पुढाकार घ्यावा. या अभियानात प्रत्येक ग्रामपंचायतीने सहभागी होऊन राज्यात जिल्ह्याचा प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत.यावेळी उत्कृष्ट पंचायत समिती व ग्रामपंचायतींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यशाळेस सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, गटविकास अधिकारी व ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

# संत रामपालजी महाराजांच्या ७५ व्या अवतरण दिना निमित्त महाराष्ट्रात लाखोंच्या उपस्थितीत भव्य भंडारा




**नंदुरबार । दिपक गोसावी**

संत रामपालजी महाराज यांच्या ७५ व्या अवतरण दिनानिमित्त देशभरातील १३ आश्रमांमध्ये तीन दिवसीय भव्य भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्रातील अनुयायांसाठी पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील आश्रमात विशेष सोहळा पार पडला. ६, ७ आणि ८ सप्टेंबर रोजी आयोजित या सोहळ्याला लाखोंच्या संख्येने भक्त उपस्थित होते, ज्यांनी भंडारा प्रसादाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमात येणाऱ्या भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी ठिकठिकाणी स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली होती. आश्रम प्रशासनानेही चोख व्यवस्था ठेवली होती, जेणेकरून कोणत्याही भक्ताला त्रास होणार नाही. विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या जनसमुदायाची उपस्थिती असूनही, कार्यक्रमस्थळी एकही पोलीस कर्मचारी नव्हता. हा कार्यक्रम पूर्णपणे शांततेत आणि सुरळीतपणे पार पडला, जो संत रामपालजी महाराजांच्या शिकवणीचाच परिणाम असल्याचे मानले जाते.

या सोहळ्यामध्ये भंडारा प्रसादासोबतच रक्तदान शिबिर आणि 'रमणी विवाह' सोहळ्याचेही आयोजन करण्यात आले होते. अनेक जोडप्यांनी हुंडा न घेता केवळ १७ मिनिटांत विवाह केला. ८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता या तीन दिवसीय सोहळ्याचा समारोप झाला.

हा कार्यक्रम गुरु-शिष्याचे नाते आणि गुरूंचे महत्त्व दर्शवितो.

गुरु गोविंद दोऊ खडे, काके लागूं पांय।
बलिहारी गुरु आपणे, गोविंद दियो बताय।

या दोह्यानुसार, जेव्हा आपल्यासमोर गुरु आणि ईश्वर (गोविंद) दोघेही उभे असतात, तेव्हा प्रथम कोणाच्या चरणांना वंदन करावे? कबीर म्हणतात की, मी माझ्या गुरुला वंदन करतो, कारण त्यांनीच मला ईश्वराचा मार्ग दाखवला.

गुरु सो ज्ञान जु लीजिये, सीस दीजये दान।

याचा अर्थ असा आहे की, गुरुंकडून ज्ञान मिळवण्यासाठी स्वतःचे मस्तक दान करावे लागते, म्हणजेच ज्ञानप्राप्तीसाठी पूर्ण समर्पण आवश्यक आहे.

हम भी पांहन पूजते, होते रन के रोझ।
सतगुरु की कृपा भई, डार्या सिर पैं बोझ।।

या दोह्यामध्ये कबीर म्हणतात की, सद्गुरूंच्या कृपेमुळेच त्यांच्या डोक्यावरील कर्मकांडाचा आणि अंधश्रद्धेचा भार उतरला, अन्यथा तेही व्यर्थ भटकत राहिले असते.

कबीरा ते नर अन्ध है, गुरु को कहते और। हरि रुठे गुरु थौर है, गुरु रुठे नहीं थौर है।

या दोह्यात कबीर स्पष्ट करतात की, जो मनुष्य गुरुला कमी लेखतो, तो आंधळा आहे. कारण जर देव रुष्ट झाला, तर गुरु आपल्याला आधार देतात, पण जर गुरु रुष्ट झाले, तर जगात दुसरा कोणीही आधार देऊ शकत नाही.या तीन दिवसांच्या सोहळ्यात प्रत्येक अनुयायी आपल्या गुरूंप्रती असलेले प्रेम व्यक्त करत होता. लाखो भक्तांच्या उपस्थितीत, शांतता आणि सुव्यवस्थेचे एक आदर्श उदाहरण या ठिकाणी पाहायला मिळाले.

# विद्युत निरीक्षक कार्यालयाच्या वतीने वृक्षारोपण




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत विद्युत निरीक्षक कार्यालय, अहिल्यानगर आणि स्पार्क इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या दिल्ली गेट येथील सब स्टेशन परिसरात या उपक्रमांतर्गत आंबा, जांभूळ, वड, नारळ, पिंपळ यांसारख्या पर्यावरणपूरक देशी झाडांची लागवड करण्यात आली.

या अभियानाप्रसंगी विद्युत निरीक्षक श्रीमती रा. सं. गीते, अभियंते योगेश सातपुते, समीर सहाणे, अमर स्वामी, श्रीमती शेख, चव्हाण तसेच स्पार्क इंडस्ट्रीजचे श्रीनिवास पाटील उपस्थित होते. कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी सांगितले की, हवामान बदलामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यावर उपाय म्हणून वृक्षारोपण अत्यावश्यक आहे. प्रत्येक कुटुंबाने किमान दोन झाडे लावून त्यांचे संवर्धन करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे स्पष्ट केले.

त्याचप्रमाणे अभियंता योगेश सातपुते यांनी महावितरण कंपनीने या उपक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच स्पार्क इंडस्ट्रीज यांनी झाडांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या उपक्रमाला अति. कार्यकारी अभियंता कुमावत यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

# दिव्यामध्ये ०५ अनधिकृत इमारतींवर कारवाई



**ठाणे । प्रतिनिधी**

दिवा प्रभाग समिती क्षेत्रात, अनधिकृतपणे बांधण्यात येत असलेल्या पाच इमारतींवर ठाणे महापालिकेने सोमवारी कारवाई केली. या अर्धव्याप्त, व्यावसायिक व निवासी इमारती रिक्त करून त्या पूर्णपणे जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील बी. आर. नगर येथील दोन इमारती, सदगुरू नगर मधील २ इमारती आणि दिवा-शीळ रोड येथील १ इमारत अशा एकूण पाच इमारतींवर पोकलेन मशीनचे सहाय्याने कारवाई करण्यात आली. या पाचही इमारती तळ अधिक एक मजल्याच्या होत्या. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी यापूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे, महापालिकेने अनधिकृत बांधकामांवरील कारवाई पुन्हा सुरू करण्यात आली आहे. निवासी तसेच व्यावसायिक स्वरूपाच्या अनधिकृत बांधकामांवरील कारवाई नियमित सुरू राहणार आहे.

सोमवारी, दिवा प्रभाग समिती क्षेत्रात झालेल्या कारवाई प्रसंगी, उपायुक्त मनीष जोशी, उपायुक्त शंकर पाटोळे, उपायुक्त सचिन सांगळे, सहाय्यक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे, सहाय्यक आयुक्त गणेश चौधरी, सहाय्यक आयुक्त ललिता जाधव, सहाय्यक आयुक्त बाळू पिचड उपस्थित होते. अतिक्रमण विभाग आणि प्रभाग समिती येथील कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

## लाडक्या बहिणींना २ महिन्यांचे पैसे एकत्र

# ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याचे ३ हजार याच महिन्यात जमा होण्याची शक्यता

**मुंबई (वृत्तसंस्था)**-लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींना ऑगस्ट महिन्याचा हप्ता न मिळाल्याने सणासुदीच्या काळात नाराज असलेल्या महिलांना आता ऑगस्ट व सप्टेंबर या दोन्ही महिन्यांचे मिळून ३ हजार रुपये याच महिन्यात जमा होण्याची शक्यता आहे. हे दोन्ही हप्ते एकत्र येणार की वेगवेगळ्या तारखांना याबाबत अद्याप अधिकृत माहिती जाहीर झालेली नाही. सलग तीन दिवस सुट्ट्या असल्याने यासंदर्भात मंगळवारी निर्णय होण्याची शक्यता एका वरिष्ठ अधिकाऱ्याने व्यक्त केली.गणपती बाप्पा विराजमान होऊन विसर्जन झाले तरी महिलांना सणासुदीच्या काळात ऑगस्टचे पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजी आहे. लाडकी बहीण योजनेचा हप्ता लांबणीवर गेला तर पुढच्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्याबाबत घोषणा केली जाते. दरम्यान, अजूनही ऑगस्टच्या हप्त्याबाबत घोषणा केलेली नाही. त्यामुळे लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींच्या मनात संभ्रम निर्माण झाले आहेत. मात्र सप्टेंबर महिन्यात दोन हप्त्यांचे पैसे जमा केले जाणार असल्याचे संकेत मिळत असून, याबाबतची अधिकृत घोषणा मंत्री अदिती तटकरे लवकरच करणार असल्याचे समजते. या योजनेला एक वर्ष पूर्ण झाले आहे. प्रारंभी या योजनेत २ कोटी ६३ लाखांपेक्षा जास्त नोंदणी झाली होती.

# उलव्यात पहिल्यांदाच अभिनयाचे बादशहा अशोक सराफ यांची एंट्री होणार



**उलवे । प्रतिनिधी**

मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज, 'पद्मश्री' पुरस्कारप्राप्त अभिनेते अशोक सराफ आणि निवेदिता जोशी-सराफ यांची रविवारी (ता.७) आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी भेट घेतली. सोबत रंगभूमी व चित्रपटसृष्टीशी निगडित अनेक वर्षे लीलया वावरणारे नरेंद्र बेडेकर होते. यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी अशोक सराफ-निवेदिता जोशी-सराफ यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात मनसोक्त गप्पा मारल्या. त्यांच्यातील साधेपणा पाहून महेंद्रशेठ यांना मनस्वी आनंद झाला. यावेळी त्यांनी 'कैलास मानसरोवर' यात्रेवरून आणलेले जल अशोक सराफ आणि निवेदिता सराफ यांना दिले. त्यांनीही ते आनंदाने प्राशन केले. यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी शाल, पुष्पगुच्छ आणि 'सुखकर्ता', 'परदेश प्रवासाची पंचविशी' आणि 'जय शिवराय' ही पुस्तके त्यांना भेट देऊन आनंद व्यक्त केला; तर अशोक सराफ यांनी त्यांच्या जीवनावरील 'बहुरुपी' हे पुस्तक आपल्या स्वाक्षरीने महेंद्रशेठ घरत यांना भेट म्हणून दिले. यावेळी अशोक सराफ यांच्याशी संवाद साधताना महेंद्रशेठ घरत म्हणाले, मी आपल्या अभिनयाचा चाहता आहे. आपल्या अनेक चित्रपटांमुळे मी मनमुराद हसलो आहे. आमच्या आख्ख्या पिढीने आपल्या चित्रपटांचा आस्वाद घेतला आहे. आपल्याला चित्रपटसृष्टीतील उत्तम कारकिर्दीबद्दल आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळाले आहेत. 'पद्मश्री' पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे. याचा मला अतिशय आनंद आहे. आईच्या नावाने 'यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थे'मार्फत आम्ही अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित आहोत. अनेक दीनदुबळ्यांना आधार देऊन त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण फुलविण्याचा प्रयत्न करतोय. त्यामुळे रायगड, नवी मुंबईच्या सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने आमच्या संस्थेमार्फत आपला नागरी सन्मान करण्याची इच्छा आहे. त्यावेळी हसतहसतच अशोक सराफ आणि निवेदिता सराफ या अभिनयावर अधिराज्य गाजवणाऱ्या दाम्पत्याने नागरी सन्मान स्वीकारण्याची संमती दिली. त्यामुळे उलव्यात पहिल्यांदाच 'पद्मश्री' पुरस्कारप्राप्त अभिनेते अशोक सराफ यांचे आगमन होणार आहे. त्यांचा २८ सप्टेंबरला 'यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थे'मार्फत 'भूमिपुत्र भवन' येथे भव्यदिव्य नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

# ठाण्यात न्यायाधीशांच्या घराचा स्लॅब कोसळला



**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्यातील बारा बंगला परिसरातील एका इमारतीच्या सदनिकेत २०२३ पासून न्यायाधीश या त्यांच्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत. इमारत जीर्ण होत असल्याने या इमारतीमध्ये राहणाऱ्या न्यायाधीशांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी दिल्या होत्या. परंतु विभागाकडून इमारतीमध्ये कोणतीही डागडुजी झाली नाही. रविवारी सायंकाळी सदनिकेतील शयनगृहात अचानक मोठा आवाज झाला.न्यायाधीशांच्या पतीने शयनगृहात पाहिले असता, छताच्या प्लास्टरचा भाग कोसळला होता. या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. परंतु घनटेनंतर न्यायाधीशांच्या पतीने याबाबत कोपरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून तक्रारीच्या आधारे सार्वजनिक बांधकाम विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

# लोकनेते मुंडे साहेबांचा बीड रेल्वे ड्रीम प्रोजेक्ट ना.पंकजाताईच्या अथक प्रयत्नांतून पूर्णत्वाकडे



## मुख्यमंत्री १७ सप्टेंबर रोजी दाखवणार हिरवा झेंडा-जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा अहिल्यानगर ते बीड रेल्वे ड्रीम प्रोजेक्ट ना. पंकजाताई मुंडे व माजी खा.प्रितमताई मुंडे यांच्या अथक प्रयत्नाने पूर्ण होत आहे.केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून अहिल्यानगर ते बीड रेल्वे दि.१७ सप्टेंबरला प्रत्यक्षात धावणार आहे.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दि. १७ सप्टेंबर रोजी हिरवा झेंडा दाखवुन शुभारंभ करणार आहेत,परळी पर्यंतचा ड्रीम प्रोजेक्ट लवकरच पुर्ण होईल असे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख यांनी सांगीतले.याबाबत अधिक माहिती देताना भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख यांनी सांगितले की,आष्टी,पाटोदा, शिरूर,बीड या भागातील जनतेचे रेल्वेचे स्वप्न येत्या १७ सप्टेंबर रोजी प्रत्यक्षात साकार होणार आहे.



गेल्या कित्येक वर्षापासून जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक अहिल्यानगर -बीड - परळी हा रेल्वेमार्ग कधी पूर्ण होतो याची चातका प्रमाणे वाट पाहत होते, अखेर तो क्षण जवळ येऊन ठेपला आहे. सुरुवातीला अहिल्या नगर ते आष्टी हा पहिला टप्पा पुर्ण करुन आष्टी पर्यंत रेल्वे सुरू करण्यात आलेली आहे. आता पुढील काम पुर्ण झाल्याने बीड पर्यंत रेल्वे धावणार असुन परळी पर्यंतचे काम प्रगतीपथावर आहे.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी अहिल्यानगर बीड परळी रेल्वेचे स्वप्न पाहिले होते व ते पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करत असताना काळाने त्यांचा घात केला पण लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण करण्याचा विडा त्यांच्या कन्या ना.पंकजाताई मुंडे व तत्कालीन खा. डॉ.प्रितम ताई मुंडे यांनी उचलून राज्य व केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्याने आता प्रत्यक्षात रेल्वे धावण्याची वेळ आली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परळी येथील सभेत रेल्वेसाठी केंद्र सरकार संपूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले होते आणि दिलेल्या शब्दा प्रमाणे त्यांनी वेळच्या वेळी निधी उपलब्ध करून दिला.लोकसभा सदस्य असताना डॉ. प्रितमताई मुंडे यांनी वेळोवेळी लोकसभेत या विषयावर पाठपुरावा केला.लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांनी राज्यात ग्रामविकास मंत्री असताना राज्य सरकारला या रेल्वेसाठी अर्धा वाटा देण्यास भाग पाडले.दोन्ही मुंडे भगिनींनी या रेल्वेसाठी अथक परिश्रम करुन बीडकरांचे व मुंडे साहेबांचे स्वप्न साकार केले आहे.यांच्या प्रयत्नांची फलश्रुती आहे.नगर बीड रेल्वेमुळे जिल्ह्याच्या विकासाला निश्चित चालना मिळणार आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी अहिल्यानगर ते बीड रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे त्यादृष्टीने रेल्वे प्रशासन आणि गतीने कामाला लागले आहे.तसेच बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील भूसंपादनाच्या कामालाही प्रशासकीय गती दिली आहे.आष्टी, पाटोदा,शिरूर,बीड लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार आहेत.दि.१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आहे त्या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे.

## शासकीय आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे बेमुदत आंदोलन

# रोजंदारी कर्मचाऱ्यांनी आमदार आमश्या पाडवींना दिले निवेदन

**मोलगी । रवींद्र वळवी**



महाराष्ट्र शासनाच्या २१ मे २०२५ च्या एका जीआरमुळे राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांमधील वर्ग ३ व वर्ग ४ ची पदे बाह्यस्रोतामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे कार्यरत रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या रोजगारावर गंभीर संकट निर्माण झाले आहे. याविरोधात कर्मचाऱ्यांनी ९ जुलै २०२५ पासून नाशिक येथील आदिवासी आयुक्तालयासमोर बेमुदत बिऱ्हाड आंदोलन सुरू केले आहे. या संदर्भात, अक्कलकुवा-धडगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी यांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य रोजंदारी वर्ग ३ व ४ संघटनेचे अध्यक्ष ललित चौधरी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. अनेक वर्षांपासून अल्प मानधनावर काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांनी, शासनाच्या या नव्या धोरणामुळे त्यांच्या नोकरीवर गदा आल्याचे म्हटले आहे. या जीआरनुसार कंत्राटी कर्मचारी भरती सुरू झाल्याने, कार्यरत रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या रोजगारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आंदोलनकर्त्यांनी आतापर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, तसेच राज ठाकरे यांनाही निवेदने दिली आहेत. या निवेदनांमध्ये त्यांनी २१ मे २०२५ चा जीआर रद्द करण्याची आणि कार्यरत कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचे आदेश पुन्हा बहाल करण्याची मागणी केली आहे. मात्र, त्यांना केवळ आश्वासनेच मिळाली आहेतअनेक महिन्यांपासून प्रशासनाच्या उदासीनतेमुळे राज्यातील अनेक संघटना, आदिवासी समाज आणि राजकीय पक्षांचा पाठिंबा या आंदोलनाला मिळत आहे. त्यामुळे आंदोलनाची ताकद वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर, रोजंदारी कर्मचाऱ्यांनी आमदार आमश्या पाडवी यांची भेट घेतली. आदिवासी समाजाचे प्रश्न विधानसभेत मांडण्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या पाडवी यांनी कर्मचाऱ्यांचे निवेदन स्वीकारले आणि या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सर्व आमदारांशी बोलून पुन्हा उपमुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचे आश्वासन दिले.यावेळी आमदार पाडवी यांनी आदिवासी समाजातील काही लोकप्रतिनिधींमध्ये एकी नसल्याने समाजाच्या प्रश्नांवर असे रोजगार संकट येत असल्याचे मत व्यक्त केले. तसेच, बाह्यस्रोत ही संकल्पना कोणत्या आदिवासी विकास मंत्र्यांच्या काळात आली, हे लक्षात घेणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले.निवेदन देतेवेळी राहुल पाडवी, संजय पावरा, वीरू पावरा, नवल पावरा, छोटूलाल पावरा, कांतीलाल वसावे, सुनील वळवी, गिरीश पाडवी, विजय पावरा, रमेश राठोड, सायसिंग वळवी आदी कर्मचारी उपस्थित होते.




बीड - बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन धम्म ध्वज संवाद रॅली बीड शहरात आगमनानिमित्त भव्य रॅली काढण्यात आली त्याचे नेतृत्व भंते विनाचार्य (बिहार) व बीड जिल्ह्यातील भिक्खू संघ सहभागी जिल्ह्यातील उपासक उपासिका दिसत आहे.

## केज येथे सापडले रोडवर हरणाचे मुंडके

**केज । गौतम बचुटे**

केज शहरातून जात असलेल्या एका रोडवर मृत हरणाचे मुंडके सापडले असल्याची खळबळजनक घटना घडली आहे. दि. ८ सप्टेंबर रोजी दुपारी १२:०० वाट च्याच सुमारास केज येथून बोबडेवाडीकडे जात असलेल्या रोड लगतच्या मस्जिद जवळच्या रोडवर असलेल्या गतिरोधक जवळ एक हरिणाचे मुंडके आणि त्याच्या मांसाचे तुकडे आढळून आले. याची माहिती नागरिकांनी पोलिसांना दिली. त्या नंतर गुप्तवार्ता विभागाचे पोलिस जमादार बाळासाहेब अहंकारे व नागरगोजे यांनी धारूर येथील वनविभागाशी संपर्क साधला आणि या घटनेची माहिती दिली. त्या नंतर वनसेवक वचिष्ठ भालेराव आणि जीवनसिंग गोके यांनी घटनास्थळी हजर झाले. त्यांनी ही माहिती पशुधन अधिकारी डॉ. थळकरी यांना दिल्या नंतर त्यांनी शवविच्छेदन केले. या प्रकरणी वनविभागाचे अधिकारी अधिक तपास करीत आहेत. त्या हरिणाची शिकणारे हत्या केल्याचा संशय :- रस्त्यावर ज्या ठिकाणी हरिणाचे मुंडके आणि मांस सापडले त्या ठिकाणी गती रोधक असल्याने कुणी तरी हरिणाची शिकार करून मांस आणि मुंडके दुचाकी वरून घेऊन जात असावे, परंतु रस्त्यावर असलेल्या गतिरोधकावर गाडी आदळल्याने ते खाली पडले असावे आणि कोणी पाहील म्हणून त्यांना चुकविण्यासाठी शिकारी पळून गेला असावा. अशी शक्यता आहे.

## देवाण घेवाणीच्या वादातून महिलेने एका पुरुषाला खांबाला बांधले

**केज । गौतम बचुटे**

केज तालुक्यातील सोनिजवळा येथे देवाण घेवाणीच्या व्यवहारातून एका पुरुषाला महिलेने खांबाला बांधले असल्याची घटना घडली आहे.या बाबतची माहिती अशी की, दि. ६ रोजी गणेश विसर्जनाच्या दिवशी केज तालुक्यातील सोनिजवळा येथील सरपंच सौ. जान्हवी ससाणे यांचे पती आणि सामाजिक कार्यकर्ते गोविंद ससाणे यांना माहिती मिळाली की, त्यांच्या गावात एका पुरुषाला वीज वाहक खांबाला एका पुरुषाला बांधून टाकले आहे. ही माहिती मिळताच सरपंच पती गोविंद ससाणे हे तिथे गेले असता त्यांना आढळून आले की, त्यांच्या गावातील शेत वस्तीवर राहत असलेल्या बळीराम गायकवाड यांना पैशाच्या देवाण घेवाणीच्या वादातून एका महिलेने त्याला गावातील विजेच्या खांबाला बांधून टाकले आहे. ही माहिती मिळताच गोविंद ससाणे हे ज्या ठिकाणी बळीराम पटेकर याला खांबाला बांधले होते तिथे गेले. त्यांनी त्या महिलेची समजूत काढली. तसेच कोणीही बेकायदेशीररीत्या आणि बेजबाबदारपणे कायदा हातात न घेता दूरवर्तन करू नये अशी समज दिली. त्या नंतर असले देवाण घेवाणीचे बेकायदेशीर आपसात व्यवहार मिटवून घेण्याचे सांगून बळीराम पटेकर याची सुटका केली.दरम्यान एका महिलेने एका पुरुषाला खांबाला बांधल्याची चवीने चर्चा सुरू असून त्याचे व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.



# जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



जागतिक कौशल्य विकास स्पर्धा दर दोन वर्षांनी होते. ही जगातील सर्वांत मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्ठता स्पर्धा असून जगभरातील २३ वर्षांखालील तरुणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलिम्पिक खेळासारखीच आहे. २ वर्षांनी आयोजित केली जाणारी सदर जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई येथे आयोजित होणार आहे. याकरीता जिल्हा, विभाग, राज्य आणि देशस्तरावर स्पर्धा घेतली जाणार असून याद्वारे गुणवान कौशल्यधारक पात्र स्पर्धक निवडले जाणार आहेत.

त्यानुसार सदर जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ मधील जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेकरीता पात्रता निकष खालीलप्रमाणे आहे.

पात्रता निकष :

१.जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे.

२.सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी ५० क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, २००४ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे.

३.तसेच, Digital Construction, Cloud Computing, Cyber Security, ICT Network Infrastructure, -dditive Manufacturing, Industrial Design Technology, Industry 4.0, Mechatronics, Optoelectronic Technology, Robot Systems Integration, Water Technology, Dental Prosthetics, -ircraft Maintenance या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, २००१ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेकरीता सर्व शासकिय व खाजगी औद्यौगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन महाविद्यालये, एमएसएमई टूल रूम्स, अभियांत्रिकी महाविद्यालये, विद्यापीठे, हॉस्पिटेलिटी इंस्टिट्यूट, स्किल ट्रेनिंग इंस्टीट्यूट, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, इतर सर्व प्रशिक्षण संस्था यांना विहीत वयोमर्यादेतील इच्छूक प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन या स्पर्धेसाठी करता येईल. यासाठी सहभाग घेण्यास इच्छुक असलेल्या पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या लिंकवर भेट देवुन दि. ३०.०९.२०२५ पर्यंत नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा. असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य रोजगार व उद्योजकता, बीड यांनी केले आहे.

## बोरगावमध्ये दारू धंद्यावर पोलिसांचा धडक छापा

### २२ बाटल्या जप्त




**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बोरगाव (बु.) येथे पोलिसांनी देशी दारू विक्री करणाऱ्या एका इसमावर कारवाई करत २२ सिलबंद बाटल्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी गु.र.नं. ४८८/२०२५, कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कल्याण बापु शिंदे (वय ६५, रा. बोरगाव बु.) हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशीरपणे देशी दारूची विक्री करीत होता. फिर्यादी बाबासाहेब रंगनाथ बांगर (वय ४९, व्यवसाय नोकरी, पो.ह. ३९, पोलीस ठाणे केज) यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली.दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ६.१५ वा. पोलिसांनी छापा टाकून बॉबी संत्रा कंपनीच्या ९० एम.एल. क्षमतेच्या २२ सिलबंद प्लॉस्टीक बाटल्या हस्तगत केल्या. या दारूची एकूण किंमत ८८० रुपये इतकी आहे.सदर कारवाई पो.ह./१६७७ सोनवणे यांनी केली असून पुढील तपासाचा भार पोह.-१००९ मुरकुटे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. मार्गदर्शन प्रभारी अधिकारी पो.नि. उनवणे यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077